**महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेची मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली मुख्यमंत्री समिती कक्ष , विधान भवन, मुंबई येथे बुधवार, दि.६ एप्रिल,२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजित केलेल्या ४९ व्या बैठकीचे इतिवृत्त.**

सदर बैठकीत मा.मुख्यमंत्री , मा.मंत्री (आदिवासी विकास) , मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास), विशेष निमंत्रित संसद सदस्य , जनजाती सल्लागार परिषदेवरील विधानसभा सदस्य, मा.मुख्य सचिव, मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव आणि इतर अन्य मान्यवर उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीस मा. मंत्री (आ.वि.) यांनी मा.मुख्यमंत्री , मा. संसद सदस्य , सर्व विधानसभा सदस्य, सर्व निमंत्रित सदस्य यांचे स्वागत केले व मा.अध्यक्षांच्या परवानगीने बैठकीत सुरूवात केली.

प्रथमत: मा.मंत्री (आ.वि.) यांनी जनजाती सल्लागार परिषदेच्या ४८ व्या बैठकीतील इतिवृत्तावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची सद्यस्थितीची माहिती दिली. त्याला बैठकीत मान्यता देण्यात आली व त्यानंतर ४९ व्या बैठकीतील विषयांवर मा.सचिव (आ.वि.) यांनी सादरीकरण केले. सादरीकरणामध्ये मा.राज्यपाल महोदय यांनी सुचविलेले विषय, मा.सदस्य जनजाती सल्लागार परिषद यांनी दि.२१ मार्च, २०१६च्या पुर्वतयारीच्या बैठकीत सुचविलेले विषय व विभागामार्फत समावेश केलेले विषय यांचा एकत्रित विचार करण्यात आला. प्रत्येक विषयावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र | विषय | संबंधित विभाग | घेण्यात आलेले निर्णय |
|---|---|---|---|
| १. | बोगस जात प्रमाणपत्रांबाबत नुकत्याच प्राप्त झालेल्या तक्रारी लक्षात घेता, ज्या योगे अस्सल अनुसूचित जमातीच्या लोकांना त्यांच्या संविधानिक अधिकारांपासून वंचित व्हावे लागले, आदिवासी सल्लागार परिषदेने यासंदर्भात घ्यावयाच्या विविध उपायोजनांच्या अवश्यकतेबाबत चर्चा करावी. | आदिवासी विकास विभाग / महसूल विभाग / गृह विभाग | मराठवाडयातील किनवट, जि.नांदेड येथील अनुसूचित जमातीच्या बोगस व बनावट प्रमाणपत्रासंदर्भात सखोल तपासणीसाठी केवळ पोलीस तपासणी पथकाची स्थापना न करता हा विषय अत्यंत गंभीर असल्याने आदिवासी विकास विभाग, महसूल विभाग व गृह विभागातील भारतीय प्रशासन सेवेतील/भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी/आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे (TRTI) अधिकारी यांची संयुक्त समिती गठित करण्यात यावी व सदर समितीने या प्रकरणाची सखोल तपासणी करुन दोषींवर गुन्हे दाखल करावेत व आपला अहवाल ६ महिन्यात शासनास सादर करावा. |
| २. | अनुसूचित जमाती प्रमाणपत्राच्या आधारे दिनांक १५.६.१९९५ पूर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचा-यांचे अनुसूचित जमातीचे जातप्रमाण जर अवैध ठरले व त्यांनी अद्यापपर्यंत वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही, त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या मागास प्रवर्गामध्ये समाविष्ट करुन अनुसूचित जमातीचे पदे रिक्त करुन घ्यावी व ती पदे ख-या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नियुक्ती देऊन तात्काळ भरावीत. | सामान्य प्रशासन विभाग | आदिवासींसाठी राखीव असलेल्या जागांवर कार्यरत असलेल्या बिगर आदिवासी कर्मचा-यांची १०० टक्के पदे रिक्त करुन त्या जागा अनुसूचित जमातीच्या प्रवर्गातूनच भरण्यात येतील असे शासनाचे धोरण असून शासनाची ही भुमिका मा.न्यायालय व मा.केंद्रीय अनुसूचित जमाती आयोगास कळविली आहे. त्यामुळे सदर रिक्त पदे भरण्यासाठी कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात यावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | दिनांक १५.६.१९९५ नंतर दिनांक १७.१०.२००१ पर्यंत शासकिय व निमशासकिय सेवेत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या ज्या कर्मचा-यांचे जातप्रमाणपत्र अवैध ठरले आहे, त्यांना सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी -२०१५/ प्र.क्र.२७६/A१५/१६-ब, दि.२१ आक्टोबर, २०१५ नुसार देण्यात आलेले तात्पुरते संरक्षण बाबत फेरविचार करणे. | सामान्य प्रशासन विभाग | दि.२१/१०/२०१५ रोजीचे शासन परिपत्रक अधिनियम, २००० च्या कलम १० मधील तरतुदीशी विसंगत असल्याने यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने कायदेशीर सल्ला घेऊन तातडीने आवश्यक कार्यवाही करावी असे मा.मुख्य सचिव यांना सूचित करण्यात आले. |
| ४. | आदिवासी उमेदवारांस नोकरीसाठी, शिक्षणासाठी, कोणत्याही निवडणूकीसाठी इ. आदिवासींच्या कल्याणासाठी असलेल्या योजनांचा लाभ घेण्यापूर्वी जात पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक करणेबाबत. | सामान्य प्रशासन विभाग | अनुसूचित जमातीच्या उमेदवारास नोकरी, शिक्षण व निवडणूक इत्यादीसाठी जात पडताळणी प्रमाणपत्र बंधनकारक करण्यात यावे. यासाठी कायदेशीर सल्ला घेऊन अधिनियम २००० मध्ये दुरुस्ती करण्यात यावी. तसेच जात प्रमाणपत्र तपासणी समितीकडे सर्वंकष व्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता असल्याने खालील उपाययोजना करण्यात याव्यात :-<br>१) तपासणी समितीच्या अधिका-यांना कायदे व न्यायालयाच्या निर्णयासंदर्भात सखोल प्रशिक्षण देण्यात यावे.<br>२) मा.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयाच्या विविध निर्णयांची पुस्तिका तपासणी समितीला उपलब्ध करुन द्यावी.<br>३) तपासणी समितीच्या प्रकरणे निकाली काढण्याच्या प्रगतीचा आढावा (Performance Audit) घ्यावा.<br>४) समितीची रिक्त पदे भरण्यात यावीत.<br>अधिनियम २००० मध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यासाठी कायदेशीर सल्ला घेऊन याप्रकरणी कार्यवाही करावी. |
| ५. | अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या सेवा व शिक्षणसंदर्भात कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी प्रस्ताव महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या विचारार्थ ठेवण्यात यावा. | सर्व प्रशासकीय विभाग | अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या नोकरी, शिक्षण व निवडणूक यासंदर्भात शासनस्तरावर विविध प्रशासकीय विभागांव्दारे धोरणात्मक निर्णय घेत असतांना ते धोरण आदिवासींच्या हिताचे संवर्धन करणारे ठरावे यासाठी सल्लागार परिषदेच्या सदस्यांच्या सूचनांचा त्यामध्ये समावेश होण्याच्या दृष्टीने अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या नोकरी, शिक्षण व निवडणूक यासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यापुर्वी प्रस्ताव महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात यावा. |
| ६. | गुजरात मध्ये अनुसूचित जमातीचे जे कुटुंब आहेत त्यांना अनुसूचित जमातीचे फायदे महाराष्ट्रात दिले जात नाहीत. | आदिवासी विकास विभाग | सचिवांनी कायदेशीर सल्ला घेवून ही बाब तपासावी व जनजाती परिषदेपुढे वस्तुस्थिती मांडावी. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | अनुसूचित क्षेत्रातंर्गत विविध स्तरांवर असलेली रिक्त पदे भरणे बाबत उपाययोजना करणे. | सामान्य प्रशासन विभाग | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील विविध स्तरावर असलेली रिक्त पदे त्वरित भरण्याची कार्यवाही सर्व प्रशासकीय विभागांनी ६ महिन्यात करावी. सामन्य प्रशासन विभागाने कालबध्द कार्यक्रम आखून रिक्त पदे भरणे बाबत सर्व विभागांना सुचना दयाव्यात. |
| ८. | "शासन अधिसूचना दि.०९/०६/२०१४ नुसार अनुसूचित क्षेत्रातील पदे ही १०० टक्के स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याच्या दृष्टीने शासन निर्णय सा.प्र.वि. दिनांक २६/०६/२०१५ अन्वये दि०५/०३/२०१५ च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आलेली आहे. सदर शुध्दी पत्रकातील १३(२) मधील तरतुदीनुसार , जिल्हयातील एकूण रिक्त पदांच्या २०% पदे ही स्थानिक आदिवासींमधून भरावयाची आहे. व उर्वरीत ८०% पदे ही नियमित आरक्षणानुसार भरावयाची आहेत. सदर ८०% पदांमध्ये अनुसूचित क्षेत्रामध्ये रिक्त पदांचा देखील समावेश असणार आहे. ही बाब मा.राज्यपालांच्या निदेशानुसार निर्गमित केलेल्या दि.०९/०६/२०१४ च्या अधिसूचनेतील अनुसूचित क्षेत्रातील पदे ही १००% स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरण्याच्या उद्देशाशी विसंगत असल्याचे मा.राज्यपालांचे सचिव यांनी निदर्शनास आणले आहे. | सामान्य प्रशासन विभाग / आदिवासी विकास विभाग | ज्या अनुसूचित क्षेत्रामध्ये आदिवासी लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त आहे. तेथे मा.राज्यपाल महोदयांचे यांचे अधिसूचने नुसार १००% पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारां मधून भरण्यात यावीत. परंतु अनुसूचित क्षेत्रात जेथे बिगर आदिवासींची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त आहे तेथे या निर्णयाचा फेरविचार करावा. जेणेकरुन बिगर आदिवांसीमध्ये असंतोष निर्माण होणार नाही. यासाठी एक समिती नेमावी व या समितीने त्यांच्या अहवाल मा.राज्यपाल महोदय यांना सादर करावा. |
| ९. | २०११ जनगणनेनुसार, महाराष्ट्रातील अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५ % आहे. तथापि, शिक्षण आणि सार्वजनिक सेवा यामध्ये अनुसूचित जमातीसाठीचे आरक्षण फक्त ७% आहे. आदिवासी सल्लागार परिषदेने ही बाब तपासून अनुसूचित जमातीचे पुरेसे प्रतिनिधीत्व खात्रीने राहण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याबाबत शिफारस करावी. | सामान्य प्रशासन विभाग | या विषयावर बैठकीत चर्चा झाली नाही. |
| १०. | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांचे कामकाज ऑनलाईन करण्या करीता "आदि प्रमाण प्रणाली" सुरु करणे | आदिवासी वि. वि. / आदिवासी संशोधन व प्रशिक्षण | अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी ऑनलाईन करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रणालीचे "आदि प्रमाण" प्रणाली असे नामकरण करुन सदर प्रणालीची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात |

| | | | |
|---|---|---|---|
| | | संस्था | यावी. |
| ११. | आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेला स्वायत्तता प्रदान होऊन बार्टीच्या धर्तीवर पुढील वाटचालीची दिशा ठरविणे. | आदिवासी वि. वि. / आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था | प्रस्ताव मान्य करण्यात आला. त्यानुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (TRTI) यांनी आराखडा तयार करुन त्याची अंमलबजावणी करावी. |
| १२. | वनहक्क कायदा-२००६ च्या अंलबजावणीचा आढावा. | महसूल व वन विभाग | वनहक्क कायदा २००६ ची अधिक प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने दावेदाराच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्रास मान्यता न देणे, प्रलंबित असलेली दावे तसेच पुनर्विलोकन अर्ज त्वरीत निकाली काढण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखून सकारात्मक निर्णय घेण्याबाबत महसूल व वन विभागाने जिल्हाधिकारी आणि उपवनसंरक्षक यांना सूचना द्याव्यात. |
| १३. | वनहक्क कायदा अतंर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या जमिन विकासासाठी कृषी विभागामार्फत योजना राबविणे. | कृषी व पदुम विभाग | वनहक्क कायद्यांतर्गत जानेवारी २०१६ अखेर पर्यंत १,४६,५८७ लाभार्थींना ३.२८ लक्ष एकर जमीनीचे वाटप करण्यात आलेले आहे. या जमिनीचा विकास करण्यासाठी कृषी विभागाकडून एक स्वतंत्र परिपूर्ण, सर्वकष कृषी योजना (Comprehensive Agriculture Development Scheme) राबविण्यात यावी. यामध्ये आधुनिक कृषी तंत्रज्ञान उपलब्ध करुन देवून येणाऱ्या ३ वर्षात योजनेची अमंलबजावणी करावी. या योजनेसाठी विशेष केंद्रीय सहाय्य योजना व भारताच्या संविधानाच्या २७५(१) अतंर्गत रु.६५.१५ कोटी निधी आदिवासी विकास विभागाकडे उपलब्ध आहे. |
| १४. | आदिवासी सल्लागार परिषदेने राज्याचे अधिनियम / कायदे पेसा अधिनियमाशी सुसंगत होणे आणि अनुसूचित क्षेत्रात पेसा अधिनियमाची अंमलबजावणी योग्य रितीने होणे या विषयी चर्चा करावी. | महसूल व वन विभाग, जलसंपदा विभाग, पदुम विभाग, गृह विभाग | कृषी विभाग, ग्राम विकास विकास व सहकार विभागांनी पेसा अधिनियमाशी सुसंगत अधिनियम/कायदे (सुधारणा) केले असून ज्या विभागांनी अद्यापही पेसा अधिनियमाशी सुसंगत सुधारणा केलेल्या नाहीत, त्या विभागांनी लवकरात अधिनियम/कायदे यामध्ये सुधारणा करावी. |
| १५. | भारतीय संविधानात केलेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अनुसूची ११ मधील २९ विषय अनुसूचित क्षेत्रातील पंचायती राज संस्थाकडे हस्तातंरीत करणे. | | अधिकारांचे विकेंद्रीकरण करण्यासाठी भारतीय संविधानात केलेल्या ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार अनुसूची ११ मधील २९ विषय पंचायत राज संस्थाकडे हस्तांतरीत करण्याचा निर्णय झाला असून त्यापैकी १४ विषय हस्तांतरीत झालेले आहेत. उर्वरीत विषय हस्तांतरण करण्यासाठी कार्यवाही करावी. |
| १६. | मागील आदिवासी सल्लागार परिषदेमध्ये झालेल्या चर्चेला अनुसरुन आदिवासी सल्लागार परिषदेने अनुसूचित जमातीच्या लोकांकडील असलेल्या जमिनींचे अवैध रित्या हस्तांतरण न होण्याबाबतच्या योग्य उपाययोजनांबाबत | महसूल व वन विभाग | पेसा कायद्यान्वये ग्रामसभेस असलेल्या विशेष अधिकाराबाबतच्या तरतुदीशी सुसंगत अशा सुधारणा महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मध्ये कराव्यात. |

| | | | |
|---|---|---|---|
| | शिफारस करावी. आदिवासी सल्लागार परिषदेने जमीन हस्तातरंण कायदा पेसा अधिनियमाच्या कलम ४(m) (iii) शी सुसंगत करण्याबाबत योग्य ते उपाय सुचवावेत. | | |
| १७. | आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी मा. श्री. एस.एस. संधु, तत्कालीन प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशी अवलोकनार्थ ठेवणे | आदिवासी विकास विभाग / महसूल व वन विभाग | आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासींना होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता नियुक्त करण्यात आलेल्या संधू समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून सदर अहवाल व महसूल व वन विभागाचे अभिप्राय याची छाननी करुन जमिनीचे हस्तांतरण करतांना आदिवासींवर अन्याय होणार नाही असा सर्वकष कायदा तयार करण्यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत निर्णयास्तव ठेवण्यात येईल. |
| १८. | ज्या मुळ गांवांचा समावेश पेसा क्षेत्रात होता, परंतु नंतर त्यांचे विभाजन होवून नवीन गाव तयार झाले आहे. त्यांना पेसा योजनेचा ५% निधी मिळत नाही. अशा गावांची माहिती घेवून त्यांना पेसा क्षेत्रामध्ये समावेश करण्यासाठी. केंद्र शासनाकडे लवकरात लवकर प्रस्ताव पाठविण्यात यावा. | महसूल विभाग / आदिवासी वि.वि./ आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे | महसूल विभाग आणि ग्रामविकास विभागाच्या सहाय्याने सन २०११ च्या जनगणनेनुसार नवीन गावांचा समावेश करणे व अपात्र गावे वगळण्याचा प्रस्ताव आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत (TRTI) डिसेंबर, २०१६ अखेर केंद्र शासनास पाठविण्यात यावा. |
| १९. | महाराष्ट्र अनुसूचीत जनजाती उपयोजना (वित्तिय साधन संपत्तीचे नियोजन, वाटप व वापर ) अधिनियम, २०१६ तयार करणे. | आदिवासी विकास विभाग | लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपयोजनेसाठी निधी उपलब्ध होण्याकरीता तेलंगणा व आंध्रप्रदेश या राज्यांच्या धर्तीवर राज्यामध्ये आदिवासी उपयोजना कायदा तयार करावा. |
| २०. | डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहारा योजना आढावा | महिला व बाल विकास विभाग / आदिवासी विकास विभाग | कुपोषण, कमी वजनाच्या बालकाचे व रक्तशयाचे प्रमाण कमी करणे, गरोदर स्त्री व स्तनदा मातेमधील वजन-उंची-निर्देशांक (BMR) वाढविण्यासाठी सदर योजना अधिक प्रभावी तसेच त्याची व्याप्ती वाढविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने खालील प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा :-<br>१) गरोदर स्त्रीला गरोदरपणाच्या संपूर्ण कालावधीसाठी व स्तनदा मातेस बाळंतपणानंतर ६ महिने इतक्या कालवधीकरीता एक वेळेचा आहार<br>२) ७ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालकांना एक वेळेचा आहार<br>३) ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना एक वेळेचा आहार<br>अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना आहार तयार करण्यासाठी भांडी उपलब्ध करुन देणे तसेच स्वयंपाकासाठी शेगडी व गॅस सिलेंडर उपलब्ध करुन देण्यात आल्याचे उपस्थितांना अवगत करण्यात आले. |

| | | | |
|---|---|---|---|
| २१. | आदिवासी सल्लागार समितीने आदिम जमाती समुह ( PVTGs) - कोलाम, कातकरी आणि माडिया गोंड यांच्या कल्याणार्थ आवश्यक विविध उपाययोजना बाबत चर्चा करुन शिफारस करावी. | आदिवासी विकास विभाग | अदिम जमाती कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आदिवासी विकास विभागाने विशेष प्राधान्य देऊन पुरेशी तरतूद उपलब्ध करुन योजना राबवावी. |
| २२. | पेसा ग्रामपंचायतींना ५% अबंध निधी योजना आढावा | आदिवासी विकास विभाग /ग्राम विकास विभाग | मा.राज्यपाल महोदयांची दि.३१/१०/२०१४ रोजीची अधिसूचना व आदिवासी विकास विभागाच्या दि.२१/०४/२०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंयायतींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण आदिवासी उपयोजना नियतव्ययाच्या ५% निधी उपलब्ध करुन द्यावयाचा असून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ग्रामविकास विभागाच्या वतीने जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत ग्रामसेवकांना सूचना देण्यात याव्यात.<br>पेसा कायदा १९९६ नियम २०१४ नुसार गांवाची निर्मिती करणे आवश्यक आहे. या कायदयानुसार अद्यापही पेसा गावांची निर्मिती केलेली नाही. अनुसूचित क्षेत्रात पेसा गावांची निर्मितीची कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्यात यावी. |
| २३. | घरकुल बांधकाम, शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांची बांधकामे आणि देखभाल-दुरुस्तीसाठी आदिवासी विभागांतर्गत स्वतंत्र "बांधकाम व्यवस्थापन कक्ष " स्थापन करणे. | आदिवासी विकास विभाग | घरकुल, शासकीय आश्रमशाळा व वसतीगृह बांधकाम/दुरूस्तीसाठी "स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष " स्थापन करण्याबाबत विभागाने तयार केलेला प्रस्ताव चांगला असून सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावा. |
| २४. | शासकीय व अनुदानित आश्रमशाळां मध्ये इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये कमी विद्यार्थी संख्या असल्यास अशा शाळेमधील विद्यार्थी जवळच्या शाळेत समायोजित करणे. | आदिवासी विकास विभाग / शालेय शिक्षण विभाग | ज्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळेमध्ये इ.१ली ते ४थी पर्यंत विद्यार्थी संख्या २० पेक्षा कमी आहे, त्या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समायोजन जवळच्या शाळांमध्ये करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाशी समन्वय साधून परिसरातील दोन्ही विभागाच्या शाळा बंद होणार नाहीत, हे तपासून निर्णय घ्यावा. नामांकित शाळा योजनेखाली दर्जदार शाळांची निवड करण्यात यावी व यासाठी शाळांचा सोयीसुविधा व दर्जाबाबत बेंचमार्क सर्व्हे करावा. तसेच आदिवासी मुला-मुलींच्या गुणवत्तेत वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून निवडलेल्या शाळांनी आदिवासी विद्यार्थ्यांची वेगळी तुकडी करु नये. |
| २५. | विशेष केंद्रीय सहाय्य योजना (SCA) व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत अनुदान या योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी जिल्हा/प्रकल्प स्तरावर महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास सहयोगी (MSTDA) ची नियुक्ती करणे. | आदिवासी विकास विभाग | केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी पंतप्रधान ग्रामीण विकास फेलोजच्या (PMRDF) धर्तीवर राज्यामध्ये महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास सहयोगी (MSTDA) उमेदवारांची निवड करुन त्यांची १ मे या महाराष्ट्रदिना पासून कार्यरत करावे. |

| | | | |
|---|---|---|---|
| २६. | आदिवासी विकास महामंडळास धान साठवणूकीसाठी सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) तत्वावर गोदामे उपलब्ध करुन देण्याबाबत | आदिवासी विकास विभाग/ आदिवासी विकास महामंडळ | सार्वजनिक खाजगी सहभाग (PPP) तत्वावर गोदामे उपलब्ध करुन घेण्याचा प्रस्ताव चांगला असून मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. |
| २७. | आदिवासी क्षेत्रामध्ये मोबाईल /दूरसंचार प्रणाली स्थापिक करण्यासाठी माहिती व तंत्रज्ञान (DIT) विभागाने तीन महिन्याच्या आत निर्णय घेणे. | माहिती तंत्रज्ञान संचालनालय | आदिवासी क्षेत्रात मोबाईल/दूरसंचार प्रणाली स्थापित करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने ३ महिन्यात निर्णय घ्यावा. |

शेवटी परिषदेचे सन्माननीय सदस्य प्रा.राजू तोडसाम यांनी मा.मुख्यमंत्री तथा अध्यक्ष यांचे तसेच अन्य उपस्थितांचे आभार व्यक्त करुन बैठक समाप्त झाल्याचे मा.अध्यक्षांच्या वतीने घोषित केले.

*****************************************************************************************************

**मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य जनजाती परिषदेच्या ४९ व्या बैठकीस उपस्थित सदस्यांची सुची**

| अ.क्र. | सन्माननीय सदस्यांचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| | **सन्माननीय सदस्य** | |
| १ | मा.श्री.उदेसिंग कोचरु पाडवी | वि.स.स. |
| २ | मा.श्री.विजयकुमार कृष्णराव गावित | वि.स.स. |
| ३ | मा.श्री.प्रभुदास बाबुलाल भिलावेकर | वि.स.स. |
| ४ | मा.श्री.संजय हनवंतराव पुराम | वि.स.स. |
| ५ | मा.श्री.कृष्णा दामाजी गजबे | वि.स.स. |
| ६ | मा.डॉ.देवराव मादगुजी होली | वि.स.स. |
| ७ | मा.प्रा.डॉ.अशोक रामाजी वुईके | वि.स.स. |
| ८ | मा.श्री.राजु नारायण तोडसाम | वि.स.स. |
| ९ | मा.श्री.पास्कल जान्या धनारे | वि.स.स. |
| १० | मा.श्री.चंद्रकांत बळीराम सोनवणे | वि.स.स. |
| ११ | मा. श्री.शांताराम तुकाराम मोरे | वि.स.स. |
| १२ | मा. श्रीमती निर्मला रमेश गावीत | वि.स.स. |
| १३ | मा. श्री.नरहरी सिताराम झिरवाल | वि.स.स. |
| १४ | मा. श्री.मिलिंद थत्ते | वि.स.स. |
| १५ | मा. डॉ.आर.के. मुटातकर | वि.स.स. |
| १६ | मा. श्री. राजगोपाल देवरा, सचिव (आ.वि) | सदस्य सचिव |
| | **कायम निमंत्रित सदस्य** | |
| १६ | मा.श्री.हरिश्चंद्र देवराम चव्हाण | संसद सदस्य |
| १७ | मा.डॉ.हीना विजयकुमार गावित | संसद सदस्य |
| १८ | मा.ॲड.चिंतामण नवशा वनगा | संसद सदस्य |
| १९ | मा.श्री.जीवा पांडू गावीत | वि.स.स. |
| २० | मा.ॲड. के.सी. पाडवी | वि.स.स. |
| २१ | मा.श्री.सुरुपसिंग हिऱ्याट्ट नाईक | वि.स.स. |
| २२ | मा.श्री.अहिरे धनाजी सिताराम ऊर्फ डी.एस.अहिरे | वि.स.स. |
| २३ | मा.श्रीमती दिपिका संजय चव्हाण | वि.स.स. |
| २४ | मा.श्री.पांडूरंग महादू बरोरा, | वि.स.स. |
| २५ | मा.श्री.वैभव मधुकर पिचड | वि.स.स. |

मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी मा. मुख्यमंत्र्याचे समिती कक्ष विधानभवन येथे सपंन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य जनजाती परिषदेच्या ४९ व्या बैठकीस उपस्थित अधिकाऱ्यांची सुची

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम | विभाग |
|---|---|---|---|
| १ | मा. श्री. स्वाधीन क्षेत्रीय | मा. मुख्य सचिव | |
| २ | श्री. दिनेश कुमार जैन | अति. मुख्य सचिव | कृषी व पणन विभाग |
| ३ | श्रीम. मेघा गाडगीळ | अति. मुख्य सचिव | वैद्यकीय शिक्षण विभाग |
| ४ | श्री. भगवान सहाय्य | अति. मुख्य सचिव | सामान्य प्रशासन विभाग (सेवा) |
| ५ | श्री. संजय कुमार | प्रधान सचिव | महिला व बाल विकास विभाग |
| ६ | श्री. सतीष गवई | प्रधान सचिव | जलसंपदा विभाग |
| ७ | श्री. व्ही . गिरीराज | प्रधान सचिव | ग्राम विकास व जल संधारण विभाग |
| ८ | श्री. उज्ज्वल उके | प्रधान सचिव | सामाजिक न्याय |
| ९ | श्री. सीताराम कुंटे | प्रधान सचिव | वित्त विभाग |
| १० | श्री. मुकेश खुल्लर | प्रधान सचिव | उर्जा विभाग |
| ११ | श्री. मनुकुमार श्रीवास्तव | प्रधान सचिव | महसूल व वन |
| १२ | श्री. नंद कुमार | प्रधान सचिव | शालेय शिक्षण विभाग |
| १३ | श्री. दीपक कपूर | प्रधान सचिव | अन्न व नागरी पुरवठा विभाग |
| १४ | श्री. प्रमोद त्र्यं. नलावडे | सचिव | सामान्य प्रशासन विभाग |
| १५ | श्री. प्रभाकर कृ. देशमुख | सचिव | ग्राम विकास विभाग व ल (जल संधारण) |
| १६ | श्रीम. सोनाली प्र. वायंगणकर | आयुक्त | आदिवासी विकास, नाशिक |
| १७ | श्री.संभाजी मो. सरकुंडे | आयुक्त | आ.सं. व प्र. सं., पुणे |
| १८ | श्री. वीरेंद्र तिवारी | मुख्य वनसंरक्षक | महसूल व वन विभाग |
| १९ | डॉ. संजय मुखर्जी | अति. आयुक्त | म.न.पा., मुबंई |
| २० | श्री.र.बा. कांबळे | उप आयुक्त | म.न.पा., मुबंई |
| २१ | श्री. सुनिल पवार, | अप्पर आयुक्त | सहकार विभाग |
| २२ | श्री. मुकूंद म. चिलवंत | सहाय्यक संचालक | माहिती व जनसंपर्क विभाग |
| २३ | श्री. शिवाजी दिवेकर | अप्पर आयुक्त | आदिवासी विकास, नाशिक |
| २४ | श्री. मिलींद गवांदे | अप्पर आयुक्त | आदिवासी विकास, नाशिक |
| २५ | श्री. नरेंद्र मांदळे | महा व्यवस्थापक | आदिवासी विकास महामंडळ, नाशिक |
| २६ | श्री. चंद्रकांत गजभिये | मु.अ. व वि का अ | पा.पु. व स्व. विभाग |
| २७ | श्री. कल्याण औताडे | खाजगी सचिव | मा. मंत्री (आ.वि.) |
| २८ | श्री. सुरेश बनसोडे | खाजगी सचिव | मा. राज्यमंत्री (आ.वि.) |
| २९ | श्री. नि.प्र. धोटे, | सह सचिव | विधी व न्याय |
| ३० | श्री. सु.ना. शिंदे | उप सचिव | आदिवासी विकास विभाग, मंत्रालय |
| ३१ | श्री. ल.गो. ढोके | उप सचिव | आदिवासी विकास विभाग, मंत्रालय |
| ३२ | श्री. प्रभाकर बा. गावडे | उप सचिव | आदिवासी विकास विभाग, मंत्रालय |

| | | | |
|---|---|---|---|
| ३२ | श्री. नितीन पांढरकामे | अवर सचिव | आदिवासी विकास विभाग, मंत्रालय |
| ३३ | श्री. रविंद्र औटे | अवर सचिव | आदिवासी विकास विभाग, मंत्रालय |
| ३४ | श्री. भगवान सावंत | अवर सचिव | आदिवासी विकास विभाग, मंत्रालय |